Prepp
Your Personal Exams Guide

Language Code : **11**

इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This booklet contains **20** Printed pages.

# FSC-26-II

## प्रश्न-पत्र-II / PAPER-II
## मराठी भाषा परिशिष्ट
## Marathi Language Supplement
## भाग-IV & V / PART-IV & V

मुख्य परीक्षा पुस्तिका संख्या / Main Test Booklet No.

मुख्य परीक्षा पुस्तिका कोड / Main Test Booklet Code
**J**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ 19 व 20) पर दिए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page 19 & 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका का पृष्ठ 2 देखें। / FOR INSTRUCTIONS IN MARATHI SEE PAGE 2 OF THIS BOOKLET.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका की एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग IV (भाषा I) **या** भाग V (भाषा II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I एवं भाग II **या** III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेज़ी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग IV व भाग V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं OMR उत्तर पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉल पॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत** है **J**। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट पुस्तिका का संकेत, OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं, जो प्रत्येक 1 अंक का है :
   भाग-IV : भाषा-I (मराठी) (प्र. 91 से प्र. 120)
   भाग-V : भाषा-II (मराठी) (प्र. 121 से प्र. 150)
7. भाग-IV में भाषा-I के लिए 30 प्रश्न और भाग-V में भाषा-II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से संबंधित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा-I और/या भाषा-II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लीजिए। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग-V (भाषा-II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा-I (भाग-IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

## INSTRUCTIONS FOR CANDIDATES

1. This booklet is a supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part IV (Language I) **OR** Part V (Language II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Part I and Part II **OR** III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part IV and Part V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ball Point Pen only** for writing particulars on this page/marking responses in the OMR Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **J**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the OMR Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **two** Parts, IV and V, consisting of **60** Objective Type Questions, each carrying 1 mark :
   Part-IV : Language-I (Marathi) (Q. 91 to Q. 120)
   Part-V : Language-II (Marathi) (Q. 121 to Q. 150)
7. Part-IV contains 30 questions for Language-I and Part-V contains 30 questions for Language-II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi language have been given. **In case the language/s you have opted for as Language-I and/or Language-II is a Language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The language being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part-V (Language-II) in a language other than the one chosen as Language-I (in Part-IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capitals) :

अनुक्रमांक : (अंकों में) / Roll Number : in figures ____________________
: शब्दों में / in words ____________________

परीक्षा केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capitals) :

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________ निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature : Invigilator's Signature :

Facsimile Signature Stamp of
Centre Superintendent : ____________________

Prepp
Your Personal Exams Guide

Language Code : **11**

ही पुस्तिका **20** पृष्ठ आहे.

# FSC-26-II

**प्रश्नपत्रिका-II**

**मराठी भाषा पुरवणी**

**भाग IV आणि V**

**चाचणी पुस्तिका कोड**

**J**

**ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.**

**या पुस्तिकेच्या मलपृष्ठावरील ( 19 आणि 20 ) सूचना काळजीपूर्वक वाचा.**

**परीक्षार्थींसाठी सूचना :**

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग IV (भाषा I) **किंवा** भाग V (भाषा II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे.**
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी पुस्तिकेतील भाग I आणि भाग II **किंवा** III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे / निळे बॉल पॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड J** आहे. OMR उत्तर पत्रिकेच्या **बाजू- 2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून मागावी.
6. या चाचणी पुस्तिकेत IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये 60 वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे.

   **भाग-IV : भाषा-I ( मराठी )** *(प्र. 91 ते प्र. 120)*

   **भाग-V : भाषा-II ( मराठी )** *(प्र. 121 ते प्र. 150)*
7. **भाग-IV** मध्ये भाषा-I साठी 30 प्रश्न आहेत आणि भाग-V मध्ये भाषा-II साठी 30 प्रश्न आहेत. या चाचणी पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा-I व/वा भाषा-II साठी निवडलेली भाषा पेक्षा मराठी वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग-V ( भाषा-II ) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा-I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक : अंकांमध्ये : ______________________

: शब्दांमध्ये : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of
Centre Superintendent ______________________

परीक्षार्थींनी **भाषा–I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील ( **प्रश्न क्र.** 91 ते 120 ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-IV (Q.No. 91-120)**, if they have opted **MARATHI** as **Language-I** only.

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग–IV

## भाषा–I

## मराठी

| |
|---|
| **महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – I** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – IV** मधील **( प्रश्न क्र. 91 ते 120 )** यांची उत्तरे द्यावीत. |

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 91 ते 99 यासाठी योग्य पर्यायांची निवड करा.**

गावाकडे घर केले तेव्हाच घराजवळ दोन गुंठे जमीन ठेवली, त्यात सेंद्रिय भाजीपाला करता यावा हा उद्देश. गेल्या वर्षी लॉकडाऊन सुरू झाल्यावर गावाकडे राहायलाच आलो. तेव्हा बऱ्याच भाज्या लावल्या. लॉकडाऊनमुळे हे नवीन दुर्लक्षित जग खुले झाल्याचा आनंद झाला. वर्षभर भाज्या पिकवल्या, त्या भाज्या खाण्यापेक्षा वाटण्यात समाधान जास्त होतं. मग मूग करावा असं वाटत होतं. मूग भरपूर होतील म्हटलं. मूग पेरला. पण कडेने भरपूर जागा राहिली मूग सगळीकडे उगवून आलाही नाही. मग वांगी, टोमॅटो, मिरच्या, फ्लॉवर, कोबी यांची रोपे कडेने लावली. पावटा, दोडका, घोसावळी, कारले यांच्या बिया टाकल्या. भेंडी, गवार, धना, मेथी, चाकवत, शेपू, पालकचे बी जागा दिसेल तिथे टाकले. पण मागच्या वेळी महिना दोन महिन्यांत काही काही भाज्या, कोथिंबीर सापडत होते आता काही लवकर दिसेना. सतत पाऊस पडत होता. मूग मात्र चांगला आला.

मुगाच्या शेंगा काळ्या पडू लागल्या. म्हणजे सुकून, पिकून तोडायला आल्या. पहिल्या दिवशी दोन बादल्या शेंगा सापडल्या. वाकून तोडताना कंबर दुखत होती. आता गौरी–गणपती साताऱ्याला बसवायचे तर शेंगांना आठवडाभर हात लागणार नाही. म्हणून मग गावाकडेच बसवायचे ठरवले. सणासाठी सून, मुलगा, नातू आले. पूर्वी या शेतात मोसंबीची बाग होती म्हणून या शेताला बागेतलं वावर किंवा शेत म्हणतात. या वावरात उसाची पारंपरिक पद्धतीने, लागवड न करता रोपे आणून लावायची, असं शिरबातात्यांनी सांगितले. नेहमीच उसाची लागवड पुरुष करतात. एक रोपे दोन फुटांच्या अंतरावर लावायचे. रोपे लावायला बायका लागतात. पाच बायका सांगितलेल्या. बायका आहेत तर मीही येते म्हटलं. मलाही काम शिकायला मिळेल. बायकांत, शेतात काम करायला छान वाटते. सगळ्या मिळून असल्या की शीण जाणवत नाही. मैत्री होते. नवऱ्यामागे शहरात गेली तरी मी मूळ शेतकऱ्याची लेक हे कसं विसरू शकेन. आवड आहे, शेतीमातीचं प्रेम, महत्त्व आहे. म्हणून आता या उतारवयात शेतात काम करावंसं वाटतं. थोडे दिवस राहिलेत आपले तर आपल्या मुळाकडे जाण्याची ओढ असावी तशी असेल. पण जीव रमतोय इथे शेतामातीत.

**91.** लेखिकेचा जीव उतारवयात कशात रमतो ?

(1) शहरी वातावरणात

(2) वेगवेगळी ठिकाणे फिरण्यात

(3) निरनिराळे पदार्थ करून इतरांना खाऊ घालण्यात

(4) गावाकडच्या शेतात आणि मातीत

**92.** लेखिकेला शेतात काम करायला आवडते कारण .....

(1) लेखिकेचे सगळेजण कौतुक करतात.

(2) सगळ्या बायका असल्याने मैत्री होऊन थकवा येत नाही.

(3) निवृत्त झाल्यानंतर हे काम करण्याचे तिने ठरवले होते.

(4) तिच्या शेताची जमीन सुपीक होती.

Prepp
Your Personal Exams Guide

**93.** 'मुगाची शेंग काळी पडणे' ही कशाची सूचना असते ?

(1) शेंग किडून जात आहे.
(2) शेंग पिकून तोडायला तयार आहे.
(3) शेंगेत दाणा भरलेला नाही.
(4) शेंगेवर कसला तरी रोग पडला आहे.

**94.** 'परंपरा' या शब्दांचे योग्य विशेषण शोधा.

(1) पारंपरिक
(2) पारंपारिक
(3) परंपरिक
(4) पारंपरीक

**95.** कोणत्या सणासाठी बाईंचे कुटुंबीय गावाकडे आले ?

(1) दसरा
(2) दिवाळी
(3) गौरी–गणपती
(4) गुढीपाडवा

**96.** लेखिकेला भाज्यांबद्दल कोणती गोष्ट जास्त समाधान देते ?

(1) भाज्या लावणे
(2) भाज्या बाजारात विकणे
(3) भाज्या इतरांना वाटणे
(4) भाज्यांचे अनेक पदार्थ करणे

**97.** गावाच्या घराजवळ लेखिकेने जमीन राखून का ठेवली ?

(1) नंतर घराचा विस्तार करण्यासाठी
(2) पुढील काळात जमीन चढ्या भावाने विकण्यासाठी
(3) सेंद्रिय भाजीपाला पिकवण्यासाठी
(4) मुलांना बागकाम शिकवण्यासाठी

**98.** शिरबातात्यांनी कोणती सूचना केली ?

(1) उसाची लागवड परंपरेनुसार करायची.
(2) उसाची लागवड रोपे आणून करायची.
(3) उसाऐवजी मोसंबीची लागवड करायची.
(4) उसाच्या बाजूने वांगी, मिरच्या, भेंडी, गवार लावायच्या.

**99.** मागच्या वेळेप्रमाणे पुढीलवर्षी लेखिकेला भाजी मिळाली नाही कारण .......

(1) लॉकडाऊनमुळे
(2) शेतात घुशींचा सुळसुळाट झाला
(3) कडक उन्हामुळे रोपे वाळून गेली
(4) सतत पाऊस पडत होता

**सूचना : पुढील कविता वाचा आणि प्रश्न क्रमांक 100 ते 105 साठी योग्य पर्याय निवडा.**

टप टप पडती अंगावरती प्राजक्ताची फुले
भिर भिर भिर त्या तालावरती गाणे अमुचे जुळे
कुरणावरती, झाडांखाली
ऊन सावली विणते जाळी
येतो वारा पाहा भरारा, गवत खुशीने डुले!
दूर दूर हे सूर वाहती.
उन्हात पिवळ्या पहा नाहती
हसते धरती, फांदीवरती हा झोपाळा झुले!
गाणे अमुचे लुकलुक तारा
पाऊस वर, मोर पिसारा या गाण्यातून फुले
फुलांसारखे सर्व फुला रे
सुरात मिसळुनी सूर, चला रे
गाणे गाती तेच शहाणे बाकी सगळे खुळे

**100.** पुढीलपैकी कोणत्या उपक्रमाचा कवीने सर्वात जास्त वेळा उल्लेख केला आहे ?

(1) फुलणे (2) झुलणे
(3) गाणे (4) जुळणे

**101.** पुढीलपैकी गाण्यातून काय फुलत नाही ?

(1) वारा (2) फुले (3) मोरपिसारा (4) पाऊस

**102.** ताऱ्याचे चमकणे कसे सुचवले आहे ?

(1) टपटप (2) झुळझुळ
(3) भिरभिर (4) लुकलुक

**103.** झाडाखाली कसली जाळी आहेत ?

(1) फुलांची (2) ऊन सावलीची (3) गवताची (4) पानांची

**104.** 'शहाणा' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द शोधा.

(1) समंजस (2) खुश (3) खुळा (4) ताल

**105.** कवितेतील 'पृथ्वी' या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.

(1) ऊन (2) धरती
(3) प्राजक्त (4) सूर

Prepp
Your Personal Exams Guide

**106.** पुढीलपैकी कोणत्या घटकाचा संस्थागत लेखनात समावेश होत नाही ?

(1) शोक संवेदना मजकूर

(2) व्यावसायिक पत्र

(3) स्व–परिचय

(4) परीक्षण/अभिप्राय

**107.** भाषा संपादन आणि भाषा शिक्षणाच्या संदर्भात उपजत गृहित कल्पना कोणती ?

(1) सर्व भाषांचे व्याकरण असते आणि मुले ते त्यांच्या पद्धतीने आत्मसात करतात, या विचाराला नाकारते.

(2) सर्व माणसे शारीरिक कवायत आणि अभिसंधानाच्या माध्यमातून भाषा शिकतात असे मानते.

(3) प्रत्येक माणसाकडे जन्मतः भाषिक ज्ञान असते असे मानते.

(4) सवय लावून भाषा शिकता येते असे मानते.

**108.** 'विषय–प्रधान भाषिक आदान' म्हणजे........

(1) भाषा कशी वापरली जाते यावर रोख असलेले भाषिक आदान

(2) आदानांचे सादरीकरण आणि त्यांची प्रक्रिया

(3) माहितीवर रोख असणारे भाषिक आदान

(4) शब्दसंग्रह, उच्चारण, व्याकरण इत्यादि

**109.** पुढीलपैकी कोणती पद्धत भाषा शिक्षणात 'शब्द आणि शब्दसंच' यांना मूलाधार मानते ?

(1) नियत कृती आधारित भाषा शिक्षण (Task-based language learning)

(2) संभाषणात्मक पद्धती (Communicative approach)

(3) शब्दगत पद्धती (Lexical approach)

(4) व्याकरण भाषांतर पद्धती (Grammar translation method)

**110.** शालेय शिक्षणातील बहुभाषिकतेचे पुढीलपैकी कोणते उद्दिष्ट **नाही** ?

(1) शाळेत अध्ययन–अध्यापनासाठी विद्यार्थ्यांच्या भाषेचा वापर करणे.

(2) शक्यतो मातृभाषा शिकणे आणि तिचा अध्ययन भाषा म्हणून वापर करणे.

(3) त्रिभाषा सूत्रानुसार मातृभाषा, हिंदी आणि इंग्रजी शिकणे.

(4) सर्व मुलं शालेय शिक्षणाची सुरुवात मातृभाषेतून करतात आणि उत्तरोत्तर (किमान दोन) भाषा आत्मसात करतात.

**111.** वाणी एक लेख मजकुरातील सर्वसाधारण तपशील जाणून घेण्यासाठी वाचत आहे. तिच्या वाचनाला काय म्हणता येईल ?

(1) अनुमान लावणे (Inferencing)

(2) न्याहाळणे (Scanning)

(3) चाळणे (Skimming)

(4) समीक्षात्मक वाचन (Critical reading)

Prepp
Your Personal Exams Guide

**112.** शाळा आधारित मूल्यमापनास उत्तेजन देण्यासाठी पुढीलपैकी कोणत्याही दोन उपयुक्त विधानांची निवड करा.

(a) यामुळे विद्यार्थी–शिक्षक दोहोंना स्वायत्तता मिळण्यास उत्तेजन मिळते.

(b) यामुळे शाळांना त्यांचे स्वतःचे नियोजन करण्यास वाव मिळतो.

(c) परीक्षा बोर्डाचे अधिकार काढून घेतले जातात.

(d) मूल्यमापनाचे नियोजन करण्यात विद्यार्थ्यांचा एक सक्रिय विद्यार्थी म्हणून समावेश केला जात नाही.

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c)

(3) (c) आणि (d) (4) (d) आणि (a)

**113.** कोणते शैक्षणिक तत्वज्ञान पुढील बाबीचा पुरस्कार करते ?

पूर्व निर्धारित सूचना श्रेणींच्या ऐवजी वास्तव जीवनावर आधारित परिस्थिती किंवा विशिष्ट परिस्थितीनुसार शैक्षणिक वातावरणाचा वापर करणे.

(1) देशीयता (Nativism) (2) संरचनावाद (Constructivism)

(3) श्रव्यभाषिकता (Audiolingualism) (4) ज्ञानात्मकता (Cognitivism)

**114.** इयत्ता सहावीचा विद्यार्थी राहूल नवीन व्याकरणिक घटक शिकताना त्याची त्याने अगोदर जे काही शिकले आहे त्यासोबत सुसंगती लावतो. यातून पुढीलपैकी कोणती कृती लक्षात येते ?

(1) स्वयंशोध कृती (Heuristic strategies)

(2) ज्ञानात्मक कृती (Cognitive strategies)

(3) अधिज्ञानात्मक कृती (Metacognitive strategies)

(4) दोन्ही, ज्ञानात्मक आणि अधिज्ञानात्मक कृती (Both Cognitive and Metacognitive strategies)

**115.** इयत्ता सातवीची शिक्षिका सात वाक्यांचा एक लहान मजकूर वाचून दाखवते. ती विद्यार्थ्यांना मजकूर काळजीपूर्वक ऐकण्यास सांगून जवळपास तसाच मजकूर त्यांना तयार करण्यास सांगते (तंतोतंत त्या सारखा नाही). शिक्षिकेच्या या धोरणाला काय म्हणता येईल ?

(1) मनोबंध निर्मिती (Schema Creation)

(2) अधोगामी कृती (Top-down strategy)

(3) ऊर्ध्वगामी कृती (Bottom-up strategy)

(4) परिच्छेद अनुलेखन (Paragraph dictation)

Prepp
Your Personal Exams Guide

**116.** शिक्षण निष्पन्नाच्या उद्दिष्टांच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान **योग्य** आहेत ?

(a) आशयकेंद्री शिक्षणाऐवजी क्षमता आधारित शिक्षणास उत्तेजन देणे.

(b) भाषेचा सर्जनशील वापर करण्याचे कौशल्य आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांना भाषा कौशल्यात प्राविण्य मिळविण्यास मदत करणे.

(c) विषयवस्तूत प्राविण्य मिळविणे आणि नंतर त्याचा वापर करण्याची क्षमता प्राप्त करणे.

(d) भाषेचा विशिष्ट कामासाठी वापर करण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे.

(1) फक्त (c) बरोबर आहे.
(2) (b) आणि (c) बरोबर आहे.
(3) (d) आणि (c) बरोबर आहे.
(4) (a) आणि (d) बरोबर आहे.

**117.** व्याकरण शिकण्याच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान 'प्रक्रियात्मक ज्ञानाचे' नेमके वर्णन करते ?

(1) घटकाबद्दल माहिती असणे.
(2) व्याकरणिक घटक, त्याचा वापर माहित असणे.
(3) व्याकरणिक नियम शिकणे आणि त्यांचा नंतर पुनर्वापर करणे.
(4) व्याकरणिक घटक कसे कार्य करते ते व्याकरणाच्या पुस्तकातून समजून घेणे.

**118.** शासकीय हायस्कूलची शिक्षिका उषाराणी आपल्या विद्यार्थ्यांना नित्यंदिनच्या वापरासाठी आणि औपचारिक वापरासाठी इंग्रजी बोलण्यास मदत करते. शिक्षिका आपल्या विद्यार्थ्यांमध्ये कोणते कौशल्य विकसित करण्याचा प्रयत्न करते ?

(1) संभाषण कौशल्य (Communication skills)
(2) आंतरवैयक्तिक कौशल्य (Interpersonal skills)
(3) ज्ञानात्मक विद्याविषयक भाषा नैपुण्य (Cognitive Academic Language Proficiency)
(4) मूलभूत आंतरवैयक्तिक संभाषण कौशल्य (Basic Interpersonal Communication Skills)

**119.** इयत्ता सातवीची शिक्षिका विद्यार्थ्यांच्या विशिष्ट प्रकारच्या चुका एकत्र करून त्यांना त्यांच्या चुकांबद्दल जागरुक करण्यासाठी महिन्यातून एकदा त्यांवर चर्चा करते. मात्र चुका कोणी केल्या आहेत हे ती सांगत नाही. ती विद्यार्थ्यांना त्या चुकांवर प्रतिसाद देण्यासही सांगते.

या धोरणाला काय म्हणता येईल ?

(1) व्याकरणात गुंतवणे आणि त्याचा अभ्यास
(2) व्याकरण शिकवणे
(3) प्रत्याभरण देणे
(4) चुकांचे विश्लेषण

**120.** आपण शब्द ऐकतो, पाहतो आणि ओळखतो त्याला काय म्हणतात ?

(1) शब्दनिधी (Lexis)
(2) उत्पादक शब्दसंग्रह (Productive vocabulary)
(3) ग्रहणशील शब्दसंग्रह (Receptive vocabulary)
(4) व्यस्त शब्दसंग्रह (Engaging vocabulary)

Prepp
Your Personal Exams Guide

परीक्षार्थींनी **भाषा–II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील ( **प्रश्न क्र.** 121 ते 150 ) यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part-V (Q.No. 121-150)**, if they have opted **MARATHI** as **Language-II** only.

Prepp
Your Personal Exams Guide

## भाग–V

## भाषा–II

## मराठी

**महत्त्वपूर्ण :** परीक्षार्थींनी **भाषा – II** चा पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग – V** मधील **( प्रश्न क्र. 121 ते 150 )** यांची उत्तरे द्यावीत.

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 121 ते 128 यासाठी योग्य पर्यायांची निवड करा.**

भारतात रेल्वेचं जितकं लोकांना आकर्षण आहे तितकं जगात कुणालाच नसेल. ड्रायव्हर हा कुठल्याही संस्थेत महत्त्वाचा भाग असतो. साधे आपण कुठे फिरायला गेलो तरी आपल्या गाडीच्या ड्रायव्हरला आपण अपार प्रेमानं सांभाळतो. इथे तर रेल्वेच्या इतक्या मोठ्या अजस्त्र पसाऱ्यात ड्रायव्हरचं महत्त्व आजही अबाधित आहे. पूर्वी अँग्लो–इंडियन लोक ड्रायव्हर असायचे. त्यावेळी कोळशाची इंजिनं असायची. तसली वाफेवर चालणारी इंजिनं आज कालबाह्य झाली, तरीही काही ठिकाणी रेल्वेची हौस म्हणून ती चालवली जातात. आज डिझेल/इलेक्ट्रिक यावर चालणारी नवीनवी इंजिनं आलेली आहेत. भारतीय रेल्वेचा प्रवास थक्क करणारा आहे. पृथ्वीच्या चोवीस प्रदक्षिणांइतके किलोमीटर आपली रेल्वे रोजच्या एका दिवसात धावत असते. ठाणे येथला पारसिकचा बोगदा 1916 साली बांधला. त्यावेळी नुकतीच रेल्वे रांगत होती. पण आता त्याच बोगद्यातून रोज असंख्य गाड्या ये–जा करतात. इंग्रजांनी बांधलेल्या अनेक स्टेशनापैकी व्हीटी स्टेशन हे एकमेव स्टेशन होतं ज्यावर पादचारी पूल नव्हता. किंबहुना, त्याची गरज वाटू नये अशीच त्याची रचना होती. जाता जाता इथे नमूद करतो, की व्हीटी स्टेशनचं जुनं नाव ज्या राणीच्या नावावर होतं, तिच्या घराण्यातून काही रक्कम दरसाल या स्टेशनच्या देखभालीसाठी यायची.

गाड्या सतत धावत असतात. एका निर्धारित गतीने धावताना समोर येणाऱ्या प्रत्येक घटनेला प्रतिसाद देत पुढे सरकावं लागतं. भोवताली रेल्वेचे रूळ आणि दगड असल्यामुळे ड्रायव्हर रूक्षच असतात असाच साधारण समज आहे. यात एकटेपणा हा त्यांच्या नशिबाने त्याला बहाल केलेला एक दुखरा सल आहे. निसर्गाच्या विरुद्ध वेळेत सतत घरापासून दूर राहणारा ड्रायव्हर माणसांत फार कमी रमतो, कारण भोवतालच्या लोकांच्या वेळेत तो घरात असतच नाही. दिवाळी, दसरा, कुठला सण, काळ, वेळ या कुठल्याच गणितात नसणारी अशी त्याची कामाची वेळ असते. मेल गाड्या साधारणपणे रात्रीच चालतात. त्यामुळे जेव्हा हा घरी असतो, तेव्हा सारं जग वेगळ्या दुनियेत असतं आणि हा मात्र मोठ्या कष्टाने स्वतःची झोप पूर्ण करत असतो. रेल्वेचा ट्रॅक हा भर वस्तीतून कधीच जात नाही, पण ट्रॅक आल्यावर मात्र त्याच्या भोवताली वस्ती इतकी गच्च होते, की ट्रॅक अगोदर की वस्ती यांच्या झगड्याला उगाचच सुरुवात होते. हळूहळू काळ बदलला. रेल्वेने कात टाकायला सुरुवात केली. तिचा पसारा वाढत असतानाच कमी श्रमाची डिझेल/इलेक्ट्रिक इंजिनं आली. त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक होतं. साधारण 1980 नंतर प्रशिक्षितांची पलटण रेल्वेत यायला सुरुवात झाली. तोपर्यंत कुणीही ड्रायव्हर बनू शकायचा. ज्याला कुठेच नोकरी नसायची, त्याला रेल्वेत ड्रायव्हरची नोकरी चटकन मिळायची.

**121.** निर्धारित या शब्दाचा समानार्थी शब्द शोधा.

(1) निष्फल (2) निष्काम

(3) निश्चित (4) निष्पत्ती

Prepp
Your Personal Exams Guide

**122.** रेल्वेचे सर्वात जास्त आकर्षण कोणत्या देशात आहे ?

(1) रशिया (2) इंग्लंड (3) भारत (4) फ्रान्स

**123.** कालबाह्य होणे या वाक्प्रचाराचा अर्थ शोधा.

(1) कायमचे स्थान असणे (2) मानमरातब मिळणे

(3) जुने, अप्रचलित होणे (4) देखभाल करणे

**124.** पूर्वी रेल्वेची इंजिने कशावर चालत होती ?

(1) डिझेल (2) पेट्रोल (3) वीज (4) कोळसा

**125.** मेल गाड्यांची सर्वसाधारणपणे वेळ कोणती असते ?

(1) पहाट (2) सकाळ (3) दुपार (4) रात्र

**126.** कोरडा या अर्थी उताऱ्यात आलेला शब्द शोधा.

(1) देखभाल (2) सभा (3) वृक्ष (4) रूक्ष

**127.** रेल्वे–ट्रॅक आल्यावर काय घडते ?

(1) रूळावरून सतत गाड्या धावू लागतात.

(2) ट्रॅकभोवती माणसांची वस्ती वाढू लागते.

(3) ट्रॅकच्या आसपास नवी स्टेशने तयार होतात.

(4) ड्रायव्हरच्या कामाच्या वेळा वाढू लागतात.

**128.** व्हीटी स्टेशनचे वैशिष्ट्य म्हणजे .......

(1) तेथे पारसिकचा बोगदा आहे. (2) त्यावर पादचारी पूल नव्हता.

(3) तेथे गाडीचे ड्रायव्हर अँग्लोइंडियन असत. (4) तेथील रेल्वेचा ट्रॅक भरवस्तीत आहे.

Prepp
Your Personal Exams Guide

**सूचना : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक 129 ते 135 यासाठी योग्य पर्यायांची निवड करा.**

गेल्या काही दिवसांत राज्याला पावसाने झोडपले. त्यामुळे बहुतांश भागातील नद्या दुथडी भरून वाहू लागल्या, अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती निर्माण झाली, तर काही ठिकाणी भूस्खलन होण्याचे प्रकारही झाले. मात्र यंदा पाऊस लांबल्याने पाण्याचा प्रश्न या पावसाने सोडवला ही दिलासादायक बाब... इतक्या मोठ्या प्रमाणात पाऊस पडण्यास अरबी समुद्रात तयार झालेली द्रोणीय स्थिती कारणीभूत होती. द्रोणीय स्थिती हा पाऊस पडण्यातील मोठा हवामानशास्त्रीय घटक आहे. म्हणूनच हवामानातील द्रोणीय स्थिती, त्याची कारणे आणि त्याचे होणारे परिणाम समजून घेणे आवश्यक ठरते.

द्रोणीय स्थिती म्हणजे पानांचा द्रोण किंवा इंग्रजी व्ही सारखा आकार असतो. ही द्रोणीय स्थिती अरबी समुद्रात म्हणजे भारताच्या पश्चिमेला असलेल्या गुजरातपासून केरळपर्यंत संपूर्ण किंवा कोणत्याही ठरावीक भागात तयार होते.

द्रोणीय स्थिती कशी तयार होते या बाबत हवामानशास्त्रज्ञ सांगतात, की जागतिक पातळीबरोबर आपल्या देशाच्या भूभागावरही हवेच्या दाबाचे पट्टे तयार होत असतात. ते हंगामानुसार बदलत असतात. प्रत्येक महिन्याला, दिवसाला सरासरी हवेच्या दाबाचे पट्टे ठरलेले असतात. भूमीवर किंवा समुद्रावरील ज्या बिंदूवर सारख्या प्रमाणात हवेचा दाब असतो, त्या ठिकाणाला समदाबाची ठिकाणे म्हणतात आणि ही समदाबाची ठिकाणे ज्या रेषेने जोडली जातात त्याला आयसोबार म्हणतात. जुलैमध्ये भारतात आयसोबार पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत असतात. त्याच्या समांतर रेषा उत्तर भारतापासून दक्षिण भारतापर्यंत तयार होतात. पृथ्वीच्या चलनवलनामुळे त्या–त्या वेळी, त्या–त्या ठिकाणी हवेचे दाब तयार होतात. तसेच मान्सून काळात अरबी समुद्रात हवेचे दाब तयार होतात आणि आयसोबार दरम्यान एकाएकी कमी दाबाची घळ तयार झाल्यास त्याला द्रोणीय स्थिती म्हटले जाते. द्रोणीय स्थिती विशेषतः जून, जुलै, ऑगस्टमध्ये तयार होते. द्रोणीय स्थिती तयार होणे ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. द्रोणीय स्थिती तयार होण्यास भारतीय समुद्रीय द्विध्रुवता (इंडियन ओशन डायपोल) हा घटक सकारात्मक असणे अधिकच पूरक ठरते.

द्रोणीय स्थिती तयार होणे पावसासाठी अनुकूल असते. या द्रोणीय स्थितीमुळे मोसमी पावसाच्या अरबी समुद्राच्या शाखेतून पश्चिम किनारपट्टी आणि मध्य महाराष्ट्रात, मराठवाड्याच्या पश्चिमेकडील चार जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. मात्र द्रोणीय स्थितीची तीव्रता किती त्यावर पावसाचे प्रमाण कमी–जास्त होते. द्रोणीय स्थिती तीव्र स्वरूपाची असल्यास समुद्राच्या पृष्ठभागापासून त्याची उंची जास्त असते. तीव्र स्वरूपाच्या द्रोणीय स्थितीमध्ये वारे द्रोणाच्या निमुळत्या आकारात येऊन आदळतात आणि तितक्याच वेगाने ते घाटमाथ्याच्या उंचीपर्यंत जाऊन आदळतात. द्रोणीय स्थिती तीव्र असताना घाटमाथा, पश्चिम किनारपट्टीच्या भागात मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. मान्सूनच्या पहिल्या दोन महिन्यांत द्रोणीय स्थिती निर्माण झाल्यास भरपूर पाऊस पडतो.

येत्या दोन–तीन दिवसांत सध्याची द्रोणीय स्थिती काहीशी विरळ झाल्यास 18 जुलैपासून थोडी उघडीप मिळण्याची शक्यता जाणवते. मात्र, काही वेळा द्रोणीय स्थिती संपूर्णपणे नाहीशी होऊनही कोकण आणि घाटमाथ्यावर पाऊस पडू शकतो. केवळ त्यासाठी अरबी समुद्राच्या नैऋत्य किंवा पश्चिमेकडून येणारे मोसमी वारे बळकट असण्याची आवश्यकता असते. द्रोणीय स्थितीमध्ये पावसाची तीव्रता मात्र अधिक असते.

**129.** पुढीलपैकी कोणता महत्त्वाचा घटक द्रोणीय स्थिती तयार होण्यास पूरक ठरतो ?

(1) हवेच्या दाबाचे पट्टे
(2) नैऋत्य दिशा
(3) पश्चिम दिशा
(4) समुद्रीय द्विध्रुवता

Prepp
Your Personal Exams Guide

**130.** जुलै महिन्यात भारतात आयसोबारचा प्रवाह कोणत्या दिशेला असतो ?

(1) उत्तरेकडून – दक्षिणेकडे
(2) पश्चिमेकडून – पूर्वेकडे
(3) पूर्वेकडून – पश्चिमेकडे
(4) दक्षिणेकडून – उत्तरेकडे

**131.** पुढीलपैकी महत्त्वाचा हवामानशास्त्रीय घटक कोणता ?

(1) द्रोणीय स्थिती
(2) घाटमाथा
(3) पश्चिमी किनारपट्टी
(4) समुद्रतळ

**132.** पुढे काही शब्दांचे मूळ रूप आणि त्याचे सामान्य रूप दिले आहेत. चुकीचा पर्याय शोधा.

(1) पाऊस – पावसाने
(2) पान – पानांचा
(3) पश्चिम – पश्चिमेला
(4) गुजरात – महाराष्ट्र

**133.** लेखकाच्या मते या वर्षी कोणती बाब आश्वासक ठरली आहे ?

(1) पाण्याचा प्रश्न सुटला
(2) पूरसदृश्य स्थिती
(3) भूस्खलन झाले
(4) मोसमी वारे

**134.** क्रियापद नसलेला पर्याय शोधा.

(1) असते
(2) दिसते
(3) कारणे
(4) ठरते

**135.** तीव्र द्रोणीय स्थितीमुळे काय घडते ?

(1) पावसाचे परिणाम समजून घेता येते.
(2) पावसाची तीव्रता अधिक असते.
(3) पावसाचे प्रमाण कमी होते.
(4) दुष्काळसदृश्य परिस्थिती होते.

**136.** इयत्ता आठवीची शिक्षिका विद्यार्थ्यांना पुढील स्वाध्याय देते. त्यावरून पुढील लेखनाला काय म्हणता येईल ?

'आता विद्यार्थ्यांना छापील पुस्तकांची आवश्यकता नाही' या विषयावर जोडीने बुद्धिमंथन करणे, कल्पनांना लिहून काढणे आणि त्या आधारावर एक चांगला मजकूर तयार करणे ज्यात दोन मत विषयाच्या विरोधात आणि दोन मत त्याच्या बाजूने असतील.

(1) वैयक्तिक लेखन (Personal writing)
(2) विवरणात्मक लेखन (Expository writing)
(3) चर्चात्मक लेखन (Discursive writing)
(4) वर्णनात्मक लेखन (Descriptive writing)

Prepp
Your Personal Exams Guide

**137.** भाषा ग्रहण आणि भाषा शिक्षणाच्या संदर्भातील उपजत गृहित कल्पनेच्या बाबतीत पुढीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) भाषा–ग्रहणात पालक, सवंगडी आणि मुलाच्या सभोवती असणारी माणसे आणि वातावरण यांचे प्रयत्न

(2) भाषा ही माणसांसाठी आणि जी माणसे भाषा बोलतात त्याच्यांसाठी वैशिष्ट्यपूर्ण असते

(3) भाषा क्षमता ही मुलांना मिळालेली देणगी असते आणि ती त्यांना काळजीपूर्वक सराव आणि अभ्यासातून सुचते

(4) भाषा क्षमता मुलांना दैवी देणगी असते त्यामुळेच ते ती ग्रहण करतात आणि उच्चारतात

**138.** पुढीलपैकी ऊर्ध्वगामी (Bottom-up) श्रवण उपक्रम कोणते ?

(1) अनुलेखन, क्लोझे (Cloze) श्रवण, बहुपर्यायी प्रश्नांचा वापर, सकारात्मक आणि नकारात्मक विधान ओळखणे

(2) सारांश करणे, संपूर्ण संदेश ऐकणे आणि पार्श्वज्ञानाचा वापर करणे

(3) ऐकल्यानंतर सरमिसळ झालेल्या शब्दांना योग्य क्रमात लावून वाक्य तयार करणे

(4) कवितेचे वाचन, तात्कालिक भाषण, वक्तृत्व आणि चर्चा

**139.** भाषा शिक्षणात 'साहित्याची/सामग्रीची शिक्षणशास्त्रीय सिद्धी' (Pedagogical realization of materials) याचा अर्थ.........

(1) भाषिक शिक्षणशास्त्रास उत्तेजन देण्यासाठीचे अंतर्निधान उपक्रम आणि कृती

(2) सामग्रीत शिक्षणशास्त्राचा अंतर्भाव करणे म्हणजे शिक्षकांना शिक्षणशास्त्राचा अवलंब करता येईल

(3) शिक्षिकेला तिच्या वर्गात शिक्षणशास्त्र समजून घेण्यास मदतरूप होणे

(4) वर्गात वापरण्यासाठी विविध शिक्षणशास्त्र धोरणांची यादी करणे

**140.** शाळेतील सर्व मुले त्यांच्या शिक्षणाची सुरुवात मातृभाषेतून करतात आणि उत्तरोत्तर एकापेक्षा अधिक भाषा आत्मसात करतात. 'शिक्षणात–भाषा धोरण' या संदर्भात याला काय म्हणता येईल ?

(1) संस्कृती विशिष्ट शिक्षणात–भाषा धोरण

(2) शालेय शिक्षणात त्रिभाषा सूत्र

(3) भाषा शिक्षणात मातृभाषा म्हणजे मूलाधार

(4) मातृभाषा आधारित बहुभाषिकता

**141.** संध्या 'मशीन लर्निंग' या वरील एक लेख काही माहिती मिळविण्यासाठी वाचते. तिचे हे वाचन म्हणजे ?

(1) दृष्टिक्षेप करणे (Glancing)

(2) परीक्षण करणे (Reviewing)

(3) चाळणे (Skimming)

(4) न्याहाळणे (Scanning)

Prepp
Your Personal Exams Guide

**142.** पुढील कृती म्हणजे........

''एका लहान मजकुराचे दोन भाग करुन किंवा त्यांतील वाक्ये आलटून पालटून एका गटाला दिली जातात. गटातील एक मुलगा ते वाक्य सांगतो नि दुसरा लिहितो. ही क्रिया पालटून पहिला मुलगा लिहितो नि दुसरा सांगतो. नंतर दोघेही एकत्र बसून पूर्ण मजकूर तयार करतात."

(1) प्रतिनिर्मिती (Transcreation) (2) परिच्छेद अनुलेखन (Paragraph dictation)

(3) सह–अनुलेखन (Mutual dictation) (4) व्याकरण अनुलेखन (Grammar dictation)

**143.** 'शिकणे म्हणजे अर्थाचा शोध घेणे' त्यामुळे शिक्षणाची सुरुवात त्याच मुद्यांपासून करावी ज्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न मुले करीत असतात.

पुढीलपैकी कोणता पर्याय वरील शैक्षणिक तत्वज्ञानाचा पुरस्कार करतो ?

(1) वर्तनवाद (Behaviourism)

(2) रचनावाद (Constructivism)

(3) बहु बुद्धिमत्ता (Multiple Intelligence)

(4) संरचनावाद (Structuralism)

**144.** घटक–प्रधान भाषा आदान (form-oriented language inputs) म्हणजे.......

(1) भाषा शिकण्यासाठी घटकाचा (आदानाचा) अर्थ

(2) शब्दसंग्रह, उच्चारण आणि व्याकरणाचा वापर

(3) माहितीवर भर असणारे आदान

(4) लिहिणे शिकण्यासाठी आदानाची क्षमता

**145.** पुढीलपैकी 'शिकण्यासाठीचे मूल्यमापन' कोणते ?

(1) अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत मुलांची प्रगती सुधारण्यासाठी आणि त्यावर लक्ष ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेले मूल्यमापन

(2) वर्षाच्या शेवटी मुलांची प्रगती जाणून घेण्यासाठी आणि त्यांना बढती देण्यासाठी तयार करण्यात आलेले मूल्यमापन

(3) विशिष्ट पातळीवर मुलांच्या यशाचे निदान करण्यासाठी राज्याकडून केले जाणारे मूल्यमापन

(4) प्रत्येक सत्राच्या शेवटी मुलांची प्रगती पाहण्यासाठी तयार करण्यात आलेले मूल्यमापन

**146.** उत्पादक शब्दसंग्रह म्हणजे काय ?

(1) बोलताना व लिहिताना आपण वापरतो ते शब्द

(2) ऐकल्यावर आपण समजतो ते शब्द

(3) आपल्याला समजत नाही ते शब्द

(4) ऐकताना कधी–कधी आपल्याला आठवतात ते शब्द

Prepp
Your Personal Exams Guide

**147.** कवितेच्या अध्ययन–अध्यापनाच्या संदर्भात पुढीलपैकी कोणत्या विधानाचे तुम्ही समर्थन करणार नाही ?

(1) कविता विद्यार्थ्यांच्या कल्पकतेच्या सरावासाठी असते

(2) कविता भाषेसोबत काम करण्यासाठी असते

(3) कविता आनंदासाठी असते

(4) कविता व्याकरण शिकविण्यासाठी असते

**148.** शिक्षिका वर्गात वेगवेगळ्या विषयांवर मुलांशी बोलते, सादर करते. या भाषिक कौशल्याला काय म्हणतात ?

(1) मूलभूत आंतरवैयक्तिक संभाषण कौशल्य

(2) वास्तव जीवनाशी संबंधित भाषा

(3) भाषिक नोंद

(4) ज्ञानात्मक विद्याविषयक भाषा नैपुण्य

**149.** पुढील विधानातून कोणते व्याकरणिक ज्ञान सूचित होते ?

'घटकाची माहिती, त्याचे विवरण आणि त्याचा मर्यादित सरावात वापर'

(1) क्षमता (Competence)

(2) अधिज्ञानात्मक ज्ञान (Metacognitive knowledge)

(3) प्रक्रियात्मक ज्ञान (Procedural knowledge)

(4) निर्देशक ज्ञान (Declarative knowledge)

**150.** पुढील उपक्रमात कोणत्या नियतकार्याचा अंतर्भाव आहे ?

''विद्यार्थ्यांना हॉटेलचे मॅन्यूकार्ड देण्यात येते आणि त्यांना 1800 रुपयांच्या मर्यादेत चार जणांसाठी खाद्यपदार्थांची ऑर्डर द्यायची आहे. एक व्यक्ती शाकाहारी आहे. एकास मशरुमची एलर्जी आहे. विद्यार्थ्यांना घरी परत जाण्यासाठी रिक्शाभाडे म्हणून 70 रुपये शिल्लक ठेवायचे आहेत. विद्यार्थी काय ऑर्डर करणार आहे, त्यांची आवड, आणि परतीच्या प्रवासासाठी लागणाऱ्या रिक्शाभाड्याविषयी चर्चा करतात.''

(1) उच्च प्रतीचे चिंतन कौशल्य

(2) (भाषेचा) अभ्यास–गुंतवणूक–प्रतिसाद–वापर

(3) ज्ञानात्मक धोरण

(4) (भाषेचा) सादरीकरण–सराव–उत्पादन

- o O o -

SPACE FOR ROUGH WORK

Prepp
Your Personal Exams Guide

**खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्न पत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.

2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तरपत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ **निळ्या किंवा काळ्या बॉल पॉइन्ट पेन** ने संपूर्ण निळे/काळे भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.

3. परीक्षार्थींनी OMR उत्तर पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक OMR उत्तर पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.

4. चाचणी-पुस्तिका आणि OMR उत्तरपत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि OMR उत्तरपत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.

5. चाचणी-पुस्तिका/OMR उत्तरपत्रिका यांवर दिलेला कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.

6. OMR उत्तरपत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेश पत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.

7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रिकाव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभागृहात/खोलीमध्ये आणण्याची परवानगी नाही.

8. मोबाईल फोन, तार रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.

9. प्रत्येक परीक्षार्थीने त्याची/तिची प्रवेश-पत्रिका पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.

10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थीला आपली जागा सोडता येणार नाही.

11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे OMR उत्तरपत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची OMR उत्तर पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल. परीक्षार्थींनी आपल्या डाव्या हाथाच्या अंगठ्याचा ठसा उपस्थिती पृष्ठावर दिलेल्या ठिकाणी करावा.

12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.

13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.

14. चाचणी-पुस्तिका अथवा OMR उत्तरपत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.

15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी OMR उत्तरपत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे. चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.**

Prepp
Your Personal Exams Guide

## निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए चार विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **नीले/काले बॉल पॉइन्ट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस OMR उत्तर पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक OMR उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं OMR उत्तर पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं OMR उत्तर पत्र के कोड या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/OMR उत्तर पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका कोड व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से उपस्थिति-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्य-सामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज़ की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और परीक्षार्थी के विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना OMR उत्तर पत्र दिए बिना एवं उपस्थिति-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार उपस्थिति-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने OMR उत्तर पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अंगूठे का निशान उपस्थिति-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी परीक्षण संस्था के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला परीक्षण संस्था के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी भी परिस्थिति में परीक्षा पुस्तिका और OMR उत्तर पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व OMR उत्तर पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

## READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the four alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Blue / Black Ball Point Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the OMR Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the OMR Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the OMR Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and OMR Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and OMR Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/OMR Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the examination hall/room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the examination halls/rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against the candidate including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their OMR Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the OMR Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Examining Body with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Examining Body.
14. No part of the Test Booklet and OMR Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the OMR Answer Sheet to the Invigilator in the Hall / Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***